दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.२१ मे २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २५८ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 21 May 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 258 • Pages 4 • Rate 4 Rs


### राखीव प्रवर्गातील तरुणांना मिळणार दिलासा

**मुंबई**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करण्यापासून रोखणाऱ्या आपल्या निर्णयावर फेरविचार करण्याचा निर्णय घेतला आहे. विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर बहुजनांच्या हक्कांना नख लावण्याचा आरोप केला होता. त्यामुळे सरकारने या प्रकरणी एक पाऊल मागे घेतले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राखीव प्रवर्गरातील तरुणांना मोठा दिलासा मिळणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने राखीव प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या एससी, एसटी व ओबीसी उमेदवारांना निवडीनंतर खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही असा वादग्रस्त निर्णय घेतला होता. या निर्णयावर विरोधकानी टीकेची झोड उठवली होती. सरकारचा हा निर्णय एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गावर अन्याय करणारा व राखीव प्रवर्गातील आरक्षण संपवण्याचा डावा आहे, असा आरोप विरोधी पक्षांनी या प्रकरणी केला होता.

# महाराष्ट्रात होणार २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मिती

## ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक; १ लाख २३ हजार ५०० नोकऱ्या उपलब्ध होणार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासोबतच देशात 'शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने मंगळवारी ऐतिहासिक आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. राज्यात तब्बल २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचा मार्ग मोकळा झाला असून, या क्षेत्रात तब्बल ६ लाख ५० हजार कोटी रुपयांची महागुंतवणूक होणार आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात महाराष्ट्रात येणारी ही गुंतवणूक देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच मोठे बळ देणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, राज्यात अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.मंत्रालयात आयोजित एका विशेष बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत देशातील चार दिग्गज कंपन्यांसोबत या ऐतिहासिक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस



हेड विवेक शर्मा, आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिझनेसचे अध्यक्ष रंजय शरण प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस आणि अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या उपस्थितीत संबंधित कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये करारांचे अधिकृत आदान-प्रदान करण्यात आले.बैठकीत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, स्वच्छ आणि हरित ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा हा अत्यंत महत्त्वाचा आणि शाश्वत घटक आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर आणि अधिक वेगवान बनेल. ही गुंतवणूक केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून, यामुळे राज्यातील तरुणांसाठी १ लाख २३ हजारांहून अधिक रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमीच देशात अग्रेसर राहील. तसेच कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण तातडीने सुरू करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

### कोणत्या कंपनीची किती गुंतवणूक?

**अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून, त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल.ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.**

# धडगाव पोलिसांची मोठी कारवाई: १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल!

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला प्रेमाचे आमिष दाखवून, तिचे अपहरण करत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याप्रकरणी जगदीश दिलीप वसावे या संशयित आरोपीविरुद्ध धडगाव पोलिसात 'पोक्सो'सह नवीन भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ११ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजेपासून ते १४ मे २०२६ दरम्यान घडली. संशयित जगदीश दिलीप वसावे (राहणार वडशिल पुनर्वसन, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार) याने पीडित अल्पवयीन मुलीला माझे तुझ्यावर प्रेम




आहे असे सांगून फुस लावली. त्यानंतर तिला मोटार सायकलवर बसवून टेंबला गावाच्या बाहेर एका निर्जन स्थळी नेले. पीडिता अल्पवयीन आहे हे माहीत असतानाही, आरोपीने तिच्या इच्छेविरुद्ध तिथे बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले.

अत्याचार केल्यानंतर आरोपीने पीडितेला, जर तू या घटनेबाबत कोणाला काही सांगितले, तर तुला आणि तुझ्या परिवाराला जिवंत मारून टाकेन, अशी भीती दाखवून धमकी दिली. त्यानंतर आरोपीने तिला अक्कलकुवा मार्गे वडशील पुनर्वसन येथे नेले आणि नंतर तिच्या घरी आणून सोडले.

या धक्कादायक प्रकारामुळे पीडित मुलगी प्रचंड मानसिक धक्क्याखाली आणि भीतीपोटी गप्प होती. अखेर वडिलांनी धीर दिल्यानंतर पीडितेने धडगाव पोलीस ठाण्यात धाव घेत घडलेला प्रकार सांगितला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत १९ मे २०२६ रोजी सायंकाळी ४,३० वाजता गुन्हा नोंदवून घेतला आहे.

धडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४ (१) (२) (फ) बलात्कार, ६५(१), १३७(२) अपहरण, ३५१(२) गुन्हेगारी धमकी आणि सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) कायदा कलम ४ व ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस हेडकॉन्स्टेबल डेव्हिड पाडवी यांनी या गुन्ह्याची नोंद केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल पाटील करत आहेत.घटनास्थळाला पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली असून, संशयित सध्या फरार आहे. पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.


# जालना तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता

**जालना । असलम कुरेशी**

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी तसेच विविध प्रलंबित कामांचा निपटारा करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज तहसील कार्यालय, जालना येथील महसुल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी विशेष सखोल पुर्नरिक्षण कार्यक्रम (SIR) अंतर्गत निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेला. मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंदणी व त्रुटी दूर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे निर्देश दिले. तसेच जनगणना प्रक्रियेचा आढावा घेत जनगणनेचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्याच्या मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच शासकीय जमिनींवरील अतिक्रमण हटविणे आणि सिलींग जमिनींसंदर्भातील प्रकरणांचाही सविस्तर आढावा घेत, शासकीय



जमिनी अतिक्रमणमुक्त करण्याच्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू कामांचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुलभ दळणवळणासाठी पाणंद रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रलंबित सिलींग प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याचे निर्देश दिले. यावेळी बैठकीस जालना तहसीलदार छाया पवार, नायब तहसिलदार यांच्यासह तहसील कार्यालयातील विविध विभागांचे कर्मचारी, मंडळ अधिकारी आदींची उपस्थिती होती.

# जन उद्रेक आंदोलनाची घोषणा; पेट्रोल-डिझेल-गॅस महागाईविरोधात ऑल इंडिया पँथर सेना रस्त्यावर उतरणार-नितीन सोनवणे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारच्या इंधन दरवाढ, गॅस सिलिंडर तुटवडा आणि महागाईच्या धोरणांविरोधात ऑल इंडिया पँथर सेनेने 'जन उद्रेक आंदोलन' सुरू करण्याची घोषणा केली आहे.

महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले की, भारतातील सामान्य माणूस आज हतबल झाला आहे. पेट्रोल-डिझेलचे भाव आकाशाला भिडले आहेत, गॅस सिलिंडर मिळत नाहीत, महागाईने कुटुंबाची कमर मोडली आहे. शिक्षण, आरोग्य महाग झाले आहे, नोकऱ्या नाहीत आणि रुपया घसरत चालला आहे. तरीही सरकार फक्त 'हिंदू धोक्यात आहे' असे म्हणून जनतेचे लक्ष वास्तविक प्रश्नांपासून हटवत आहे.

नितीन सोनवणे यांनी पुढे म्हटले, आम्ही लवकरच जन उद्रेक आंदोलनाद्वारे रस्त्यावर उतरून सरकारला स्पष्ट संदेश देणार आहोत. इंधनाचे भाव ताबडतोब कमी करा, गॅस तुटवडा संपवा, बेरोजगारीवर तोडगा काढा आणि महागाई नियंत्रित करा.

**२६ मे रोजी सहभागाचे आवाहन**

नितीन सोनवणे यांनी सर्व सामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि युवकांना दिनांक १९ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करायची झाली



की 'हिंदू धोक्यात' म्हणणाऱ्या भाजपा सरकारला जनता जशास तसे उत्तर देणार आहे, असा इशारा त्यांनी दिला.

**आंदोलनाचे मुख्य मुद्दे**

पेट्रोल-डिझेल दर तात्काळ कमी करणे

घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुनिश्चित करणे

बेरोजगारी निर्मूलनासाठी ठोस उपाय

महागाई नियंत्रण

ऑल इंडिया पँथर सेनेने 'जन उद्रेक आंदोलन' अंतर्गत राज्यभरात आंदोलने करण्याची तयारी सुरू केली असून, बीड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात सहभाग अपेक्षित आहे.

# रस्ते कामांचा वेग मंदावला; अमेरिका-इराण संघर्षामुळे डांबराचे दर दुप्पट झाल्याचा परिणाम!

दैनिक वादळ वार्ता

**नवी मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धजन्य तणावामुळे आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या पुरवठा साखळीत अस्थिरता आहे. याचा परिणाम आता रस्ते विकास क्षेत्रावर दिसू लागला आहे. बिटुमेन (डांबर) आणि एलडीओ (लाइट डिझेल ऑइल)च्या दरांमध्ये मोठी वाढ झाली असून बाजारात तुटवडा निर्माण झाल्याने नवी मुंबईसह राज्यातील रस्ते डांबरीकरण आणि दुरुस्ती कामांचा वेग मंदावला आहे. पावसाळा जवळ येत असताना अनेक ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत असल्याचे चित्र आहे. उद्योग क्षेत्रातून मिळालेल्या माहितीनुसार, डांबराचा दर सुमारे ४० हजार रुपये प्रति टनवरून थेट ८० हजार रुपये किंवा त्याहून अधिक झाला आहे. एलडीओचे दरही ६० हजारांवरून वाढून १ लाख ४० हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. या दरवाढीमुळे रस्ते बांधकामाचा संपूर्ण खर्चाचा ताळमेळ बिघडला असून कंत्राटदारांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कामांचा वेग कमी झाला आहे, तर काही कामे तात्पुरती थांबवण्यात आली आहेत. नवी मुंबईत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजवणे, खराब




रस्त्यांचे डांबरीकरण आणि पुनर्पृष्ठभागीकरणाची मोठी मोहीम राबवली जाते. मात्र यंदा डांबर उपलब्धतेतील अडचणी आणि वाढलेले दर यामुळे काही प्रमुख रस्त्यांवरील अंतिम डांबरीकरण रखडले आहे. विशेषतः सेवा वाहिन्यांच्या (महानगर गॅस, इंटरनेट केबल) कामांमुळे खोदलेले रस्ते पूर्ण करण्यावर परिणाम झाला आहे.कंत्राटदारांनी वाढलेल्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर दरवाढीची भरपाई देण्याची मागणी केली असून त्यावर शासनस्तरावर निर्णय प्रलंबित आहे. दरम्यान, काही भागांत उपलब्ध मर्यादित डांबर वापरून तात्पुरती डागडुजी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र ते पुरेसे नसल्याचे वास्तव आहे.

दरम्यान, कच्च्या तेलाची दरवाढ आणि पुरवठ्यातील तुटवडा यांचे दुहेरी आव्हान सध्या रस्ते विकास यंत्रणेसमोर उभे राहिले असून पावसाळा जवळ येत असताना कामांचा वेग मंदावला आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास नागरिकांना पुन्हा एकदा खड्डेमय रस्त्यांचा सामना करावा लागू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

नवी मुंबई विमानतळ नामकरणावर सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय; दि. बा. पाटील यांच्या नावाची याचिका फेटाळली प्रशासनाचे म्हणणे शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला असून सुमारे पावणे ६०० किलोमीटर रस्ते शहरात आहेत. त्यापैकी सुमारे १७५ किलोमीटर काँक्रीटचे रस्ते असून उर्वरित डांबरी रस्ते आहेत. पावसाळ्यापूर्वीच्या कामांचा आढावा घेतला असून खड्डे व दुरुस्तीची बहुतांश कामे अंतिम टप्प्यात आहेत. पुढील १० ते १५ दिवसांत उर्वरित कामे पूर्ण करून नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाईल. काही ठिकाणी एम-१६ काँक्रीटसारखे पर्यायी उपायही वापरता येऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले.

अमेरिका-इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे डांबराची उपलब्धता कमी झाली असून दर दुपटीने वाढले आहेत. याचा थेट परिणाम कंत्राटदारांच्या कामांवर झाला आहे. कंत्राटदारांकडून दरवाढीच्या भरपाईची मागणी केली जात आहे. मात्र शासनाकडून निर्णय झाल्याशिवाय त्याबाबत कार्यवाही करता येणार नाही. नवी मुंबईतील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे आणि मोठ्या अडचणी निर्माण होणार नाहीत यासाठी आम्ही दक्ष आहोत. - शिरीष आरदवाड, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका

# संपादकीय

## सोनेआयातीचा फास

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशातील जनतेला विशिष्ट खर्चातील काटकसरीचे आवाहन केले आहे. मोदी यांच्या मनातील 'अर्थ' काहीही असला, तरी त्यांच्या आवाहनातील विषयांबाबत वस्तुस्थिती काय आहे, आणि देशाला कोणत्या धोरणाची गरज आहे, याची सखोल चर्चा एकेका मुद्द्याच्या अनुषंगाने करू.मोदी यांनी असे आवाहन केले आहे की, 'सोन्याची बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी सोन्याची आयात करावी लागते. त्यामुळे परकीय चलन खर्च होते. त्यावर अतिरिक्त बोजा पडू नये,यासाठी सोन्याची खरेदी करू नका.' पण हे सांगणाऱ्या मोदी यांच्या सरकारने जगात सोन्याच्या किमती १० ग्रॅमला १ लाखावर जात असताना, जून २०२४ मध्ये सोन्याच्या आयातीवरील १५ टक्के इतका आयात कर कमी करून तो ६ टक्क्यांवर आणला. इतकेच नव्हे तर दोन महिन्यांपूर्वी फेब्रुवारीमध्ये तो आणखी कमी करून ५ टक्क्यांवर आणला. म्हणजेच सोन्याची आयात स्वस्त केली. त्याचा परिणाम म्हणून भारतातील सोन्याच्या आयातीमध्ये २४ टक्के वाढ झाली. गंमत म्हणजे, मोदींनी आवाहन केल्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे १३ मे २०२६ रोजी पुन्हा तो कर १५ टक्क्यांपर्यंत वाढविला आहे. जर या वाढीमागील उद्देश सोन्याची आयात कमी करणे हा असेल, तर २०२४ मध्ये हाच कर १५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांवर खाली आणला, त्याचा उद्देश सोन्याच्या आयातीला उत्तेजन देणे हा होता, असे समजायचे काय ? हे धोरण अत्यंत विसंगतीपूर्ण असले तरीही आपण सोन्याच्या आयातीबाबत योग्य धोरण कोणते, याची चर्चा करू. सोन्याची आयात हा देशाच्या गळ्याभोवती लागलेला फास आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे–

सोने म्हणजे देशासाठी घातक बचत आहे. कारण ही बचत कधीच भांडवल म्हणून कोणत्याही उद्योग–उत्पादन–व्यापारात जात नाही. अर्थव्यवस्थेत त्यातून कोणतेही सकारात्मक चक्र सुरू होत नाही. सोन्याचे दागिने बनविणाऱ्या कारागिरांचा अपवाद वगळता कोणताही रोजगार त्यातून निर्माण होत नाही.त्याचा भारतातून सोन्याचे–हिऱ्यांचे दागिने निर्यात होतात, हे खरे; पण त्यापैकी सोन्याच्या दागिन्यांचे (हिऱ्यांचे दागिने वगळून) भारताच्या एकूण निर्यातीमधील प्रमाण दीड टक्काच आहे. तर सोन्याच्या आयातीचे, भारताच्या एकूण आयातीमधील प्रमाण ९ टक्के आहे. २०२५–२६ मध्ये आपण ७१ अब्ज डॉलर म्हणजे ६ लाख ६७ हजार कोटी रुपयांचे सोने आयात केले. सोन्यात होणारी बचत जनतेकडून थेट उद्योगात न जाता अगदी बँका–म्युच्युअल फंड–तत्सम संस्थांमध्ये गेली, तरी त्यातून ती अंतिमतः उद्योगांना दिल्या जाणाऱ्या भांडवलात रूपांतरित होऊ शकते. शिवाय सोन्याच्या आयातीमध्ये जाणारा पैसा हा परदेशात जातो. देशात आलेल्या सोन्यामुळे कोणतेही नवे उत्पादन किंवा रोजगार निर्माण होत नाही. ही बचत जर उद्योग–व्यापारात गुंतवली गेली,तर त्यातून दागिन्यांच्या धंद्यातील रोजगारापेक्षा कित्येक पट अधिक रोजगार आणि उत्पन्न निर्माण होऊ शकेल.देशात गेली ७ दशके होत असणारी सोन्याची आयातीची गेल्या १० वर्षांची सरासरी सुमारे ८०० टन आहे. देशांतर्गत सोन्याचे उत्पादन अत्यंत नगण्य आहे. म्हणजे सोन्याच्या आयातीच्या तुलनेत पाव टक्कादेखील नाही. गेली काही दशके, सर्व वस्तू आणि सेवांच्या एकूण आयातीमधला सोन्याच्या आयातीचे मूल्य सुमारे आठ टक्क्यांच्या जवळपास आहे, म्हणजे साधारणतः ६ लाख ६७ हजार कोटी रुपये(२०२५–२६) इतके प्रचंड आहे. त्यापेक्षा अधिक हिस्सा हा फक्त आपल्या देशाच्या संपूर्ण इंधनाची गरज भागविणाऱ्या क्रूड तेलाचाच (सुमारे २०–२३ टक्के) आहे. त्याशिवाय होणारी सोन्याची चोरटी आयात वेगळी.सोन्याच्या आयातीमुळे देशात मुळातच कमी असणाऱ्या परकीय चलनावर अत्यंत अनुत्पादक बोजा गेली कित्येक दशके सातत्याने पडत आलेला आहे. भारताला मुळातच परकीय व्यापारामध्ये तूट आहे. म्हणजे आपली आयात ही निर्यातीपेक्षा किती तरी जास्त आहे. त्यामध्ये सोन्याच्या आयातीमुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर प्रचंड ताण पडतो. ते परकीय चलन मिळविण्यासाठी देशाला अनेक राजकीय–आर्थिक तडजोडी कराव्या लागतात.सोन्याच्या अतिधोकादायक आणि सतत वाढत्या मागणीचे कारण लग्नात सोन्याचे दागिने करणे हे नसते. तर कर चुकवलेले, भ्रष्टाचारातून मिळवलेले बेकायदा उत्पन्न आणि संपत्ती सुरक्षित ठेवण्याचा तो एक राजमार्ग आहे. त्यामुळेच सोन्याची एवढी प्रचंड मागणी मुख्यतः धनदांडग्या आणि उच्च वर्गाकडून असते. म्हणूनच मोदी सरकार गेली १२ वर्षे हेच धोरण सोन्याच्या आयातीला उत्तेजन देऊन चालवत आहे. केवळ आत्ताच्या काळासाठी नाही, तर सोन्याची आयात कायमसाठीच बंद करायला हवी. हीच बाब १९६० च्या दशकापासून विविध पंतप्रधानांच्या काळात आणलेल्या सुवर्णनियंत्रण कायद्यांमधून अधोरेखित झाली आहे. त्यामध्ये कोणताही सुधारणा करण्याचा विचार १९९० पासून घेतलेल्या तथाकथित उदारीकरणाच्या धोरणातून दिसला नाही. २०१३ मध्ये त्या वेळचे अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी सोन्याची खरेदी करायची नाही, असे निदान एक वर्ष तरी जनतेने स्वतःहून ठरवावे, असे आवाहन केले. होते. आज पंतप्रधान मोदी सोन्याची खरेदी टाळा, असे आवाहन करत असले, तरी सोन्याच्या आयातीच्या रूपाने देशाच्या गळ्याला फासच लागतो. त्यांना सध्या क्रूडच्या वाढत्या किमती, ढासळणारी निर्यात, यांच्या पार्श्वभूमीवर परकीय चलनाच्या समस्येवर तात्पुरता उपाय काढायचा आहे. धोरणात्मक बदल करण्याचा त्यांचा इरादा नाही, हीच मोठी शोकांतिका आहे.य परकीय चलनावरचा असह्य बोजा कमी करण्यासाठी २०१५ मध्ये सरकारने स्वत:चे सुवर्ण रोखे बाजारात आणले. सोने प्रत्यक्ष आयात न करतादेखील सोन्यामध्ये गुंतवणूक केल्याचा फायदा देण्याचा यात उद्देश होता. परंतु जसे आंतरराष्ट्रीय बाजारात २०२३ पासून अफाट वेगाने किमती वाढू लागल्या. त्यामुळे फेब्रुवारी २०२५ मध्ये ही योजना अधिकृतरीत्या बंद करण्यात आली. आणि सोन्याच्या आयातीवरील करात मोठी कपात करून तो १५ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणण्यात आला. त्यामुळे आयातीमध्ये किती वाढ झाली,ते सोबतच्या लेखांतील तक्त्यामधून दिसतेच आहे. थोडक्यात, सरकारने स्वतःवरचे ओझे कमी करण्यासाठी, देशाच्या परकीय चलनासमोर मोठे संकट निर्माण करून पूर्वीची समस्या अधिकच मोठी करण्याची घोडचूक केली !

# शिक्षक कॉलनी येथे एक कोटी रुपये खर्चाच्या अत्याधुनिक 'नमोउद्यान' चे दिमाखात उद्घाटन!

## लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्यान असे होणार नामकरण; दर्जेदार कामाचे नगराध्यक्षांचे आश्वासन!

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी



केज शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील नागरिकांसाठी एक आनंदाची आणि हक्काच्या विरंगुळ्याची बातमी आहे.याभागातील २३ गुंठे ओपन स्पेस (खुली जागा) मध्ये तब्बल एक कोटी रुपये खर्च करून साकारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक 'नमो उद्यान' चे भव्य उद्घाटन दि.२० मे २०२६ बुधवारी अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाले.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांच्या सह शहरातील अनेक मान्यवर आणि प्रभागा तील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे नाव देणार – गटनेते हारूणभाई इनामदार**

या कार्यक्रमाच्या दरम्यान बोलताना गटनेते हारूण भाई इनामदार यांनी एक महत्त्वाची घोषणा केली. शिक्षक कॉलनीतील या नमो उद्यानास लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्यान असे नाव देण्यात येत असल्याचे त्यांनी जाहीर केले.या नामकरणामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**कामाच्या दर्जाबाबत तडजोड नाही– नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड**

नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांनी उपस्थित नागरिकांना संबोधित करताना सांगितले की,शिक्षक कॉलनी भागाचा विकास आणि नागरिकांना उत्तम सोयी–सुविधा देणे हे आपले प्राधान्य आहे.या उद्यानाचे काम पूर्णपणे अत्याधुनिक आणि दर्जेदार दर्जाचे केले जाईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

**मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती**

या उद्घाटन प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती. यामध्ये प्रामुख्यानेपत्रकार प्रकाश मुंडे,

नगरसेवक बाळासाहेब गाढवे,नगरसेविका पद्मीन अक्का शिंदे.

शिक्षण व प्रशासकीय क्षेत्रातील एम.डी.घुले सर,अंधारे सर,कराड साहेब, मेजर धिवार साहेब,इंजिनिअर इनामदार साहेब,शेख खय्युम,मयूर टकले, विकास बिक्कड,धिवार मामा,आमेर इनामदार, रोडे भैया तसेच गुत्तेदार केंद्रे आणि केज नगर पंचायतीचे कर्मचारी आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप अत्यंत स्नेहपूर्वक झाला. उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि नागरिकांचेआभार एम.डी.घुले सर यांनी मानले.या उद्यानामुळे शिक्षक कॉलनी परिसराच्या सौंदर्यात भर पडणार असून बालकां पासून ज्येष्ठ नागरिकां पर्यंत सर्वांसाठीच हे उद्यान एक उत्तम केंद्र ठरणार आहे.यामुळे केजच्या वैभवातआणखी एक भर पडणार असून दर्जेदार व अत्याधुनिक सुविधांचे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब नमो उद्या तीन महिन्यात पूर्ण होऊन त्याचे लोकार्पण करण्यात येईल असे गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# केज तालुक्यातील ग्राहकांना गॅससाठी ६० किमी फरफटीची वेळ; गॅस वितरणातील गैरसोयीविरोधात कृष्णा केदार व गंगाराम केदार यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील ग्रामीण भागातील घरगुती गॅस ग्राहकांना सध्या मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी तब्बल ५० ते ६० किलोमीटरचा प्रवास करून बीड येथे जावे लागत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.या संपूर्ण प्रकरणात ग्रामीण ग्राहकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करत ग्राहक कृष्णा केदार व गंगाराम केदार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की,केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत केज तालुक्यातील हजारो पात्र लाभार्थ्यांना घरगुती गॅस कनेक्शनचे वाटप करण्यात आले होते. ग्रामीण भागातील महिलांना चुलीच्या धुरापासून मुक्ती मिळावी स्वयंपाकासाठी सुरक्षित इंधन उपलब्ध व्हावे आणि आरोग्याच्या समस्या कमी व्हाव्यात या उद्देशाने ही योजना राबविण्यात आली होती. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला होता.




विडा सर्कल परिसरातील अनेक ग्राहकांना प्रदीप गॅस एजन्सीमार्फत गॅस कनेक्शन व गॅस बुक देण्यात आले होते.अनेक वर्षांपासून ग्राहकांकडे संबंधित एजन्सीचे गॅस बुक असून त्याच माध्यमातून गॅस बुकिंग आणि वितरण प्रक्रिया सुरू होती.त्यामुळे ग्राहकांचा एजन्सीवर पूर्ण विश्वास होता.मात्र अलीकडील काही दिवसांत ग्राहक गॅस बुकिंगसाठी एजन्सीकडे गेल्यानंतर त्यांना धक्कादायक माहिती देण्यात येत असल्याचे समोर आले आहे. ग्राहकांनी आधारकार्ड व गॅस बुक दाखविल्यानंतर आपले गॅस कनेक्शन आमच्या एजन्सीकडे नाही असे सांगण्यात येत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रदीप गॅस एजन्सीच्या नावाने गॅस बुकांचे वाटप झाले, बुकिंग झाले,वितरण झाले मग अचानक हे कनेक्शन दुसरीकडे कसे वळविण्यात आले? याबाबत ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना का देण्यात आली नाही? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

ग्राहकांच्या म्हणण्या नुसार,त्यांचे गॅस कनेक्शन परस्पर सुरज गॅस एजन्सीकडे वर्ग करण्यात आले आहे. मात्र ही एजन्सी बीड येथे असल्याने केज तालुक्यातील ग्रामीण नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी थेट बीड गाठावे लागत आहे. विशेष म्हणजे अनेक गावांमधून बीडपर्यंतचे अंतर ५० ते ६० किलोमीटरपर्यंत आहे. त्यामुळे एका गॅस सिलिंडरसाठी पूर्ण दिवस खर्च करावा लागत असून आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांकडे स्वतःचे वाहन नाही.त्यामुळे खासगी वाहन करून गॅस सिलिंडर आणावे लागत आहे.काही नागरिकांना भाड्याने ऑटो किंवा छोट्या वाहनांचा वापर करावा लागत असून सिलिंडर आणण्याचा खर्चच अनेकदा गॅसच्या किंमती इतका होत असल्याची परिस्थिती आहे.त्यामुळे उज्ज्वला योजनेतून मिळालेला लाभ आता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. अनेक कुटुंबातील पुरुष कामानिमित्त बाहेरगावी असल्याने महिलांनाच गॅस सिलिंडरसाठी धावपळ करावी लागत आहे.वृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच गरीब कुटुंबांसाठी ही समस्या आणखी गंभीर बनली आहे.गॅससाठी एवढी फरफट करायची असेल तर योजना नेमकी कोणासाठी?असा सवाल आता ग्रामीण भागातून उपस्थित केला जात आहे.यासंदर्भात कृष्णा केदार व गंगाराम केदार यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देत संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

ग्राहकांची पूर्वपरवानगी न घेता गॅस कनेक्शन दुसऱ्या एजन्सीकडे कसे वर्ग करण्यात आले? यामध्ये नियमांचे पालन झाले का? तसेच ग्रामीण ग्राहकांची गैरसोय लक्षात घेऊन केज तालुक्यात किंवा मस्साजोग परिसरात आठवड्यातून किमान एक दिवस तरी गॅस वितरणासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.तसेच संबंधित गॅस एजन्सींनी ग्राहकांना योग्य माहिती न देता दिशाभूल केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.अनेक ग्राहक आजही जुन्या गॅस बुक वर बुकिंगसाठी जात असून त्यांना अचानक कनेक्शन आमच्याकडे नाही असे सांगितले जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि संताप दोन्ही वाढत आहेत.

दरम्यान,या संपूर्ण प्रकरणामुळे केज तालुक्यातील ग्रामीण भागात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा,अन्यथा पुढील काळात आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे.ग्रामीण भागातील सर्वसामान्य ग्राहकांची होणारी पिळवणूक थांबवून गॅस वितरणाची सुलभ व्यवस्था करावी,अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# उपमुख्यमंत्री शिंदे एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने दिल्लीला रवाना

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला शिंदे यांचा प्रतिसाद; खाजगी विमानाऐवजी प्रवासी विमानाला दिले प्राधान्य

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आपल्या नियोजित दिल्ली दौऱ्यासाठी खाजगी विमानाऐवजी एअर इंडियाच्या प्रवासी विमानातून करण्याचा निर्णय घेतला. आज दुपारी ४ वाजताच्या एअर इंडियाच्या प्रवासी विमानाद्वारे मुंबईहून दिल्लीला रवाना झाले.यावेळी शिंदे यांचे मुंबई विमानतळावर उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी अनेकांनी त्यांच्यासोबत फोटो काढून घेतले. तर काहींनी त्यांना भेटून आपले निवेदन त्यांच्या हाती दिले. या सर्वांना भेटून त्यांचे अभिवादन स्वीकारत शिंदे यांनी आपले विमान गाठले.

केंद्रीय नगरविकास विभागाच्या वतीने दिल्लीत स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० ची विशेष आढावा बैठक आज आणि उद्या दिल्लीत आयोजित केली आहे. या बैठकीत सहभागी होण्यासाठी शिंदे आज दुपारी दिल्लीला रवाना झाले. उद्या ते स्वतः या बैठकीत सहभागी होणार आहेत. एरवी खाजगी विमानाने प्रवास करणाऱ्या शिंदे यांनी यावेळी मात्र सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे प्रवासी विमानाने दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. जागतिक बाजारपेठेत तेलाचा किंमती वाढल्याने भविष्यातील धोका ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचा संदेश दिला होता. या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी देशातील आपल्या राजकीय सहकाऱ्यांनाही केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत विशेष बैठक घेऊन राज्यातील सर्व मंत्र्यांसाठी नियमावली जाहीर केली होती. यानंतर शिंदे यांनी या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी तत्काळ ईव्ही गाडी वापरण्याचा निर्णय घेतला. तसेच आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या देखील कमी केली. त्याचप्रमाणे हेलिकॉप्टरने होणारे आपले दौरे देखील कमी केले असून, आता तर खाजगी विमानाने प्रवास न करता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने प्रवास करण्याला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या आवाहनाचे पालन करण्यात उपमुख्यमंत्री शिंदे कोणतीही कसूर बाकी ठेवत नाहीत हेच त्यांचा या छोट्याशा कृतीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



# जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा

## विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ना.चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता

**अमरावती । प्रतिनिधी**

ना. चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, आमदार प्रवीण तायडे, प्रताप अडसड, संजय खोडके, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, रवी राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगर पालिका आयुक्त वर्षा लड्डा उपस्थित होते.बैठकीदरम्यान जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा, विकासकामांच्या प्रगतीचा, प्रलंबित विषयांचा तसेच आगामी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांना कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री महोदय यांनी दिलेत

बैठकीत पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, कृषी, लघु सिंचन, ग्रामपंचायत, बांधकाम तसेच सामान्य प्रशासन विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करावे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.उमेद अभियान अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बचत गटांना बळकटी देण्यासाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचे फिरते भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल. स्वच्छ भारत मिशन मध्ये पाच हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसह आसपासच्या गावांचा क्लस्टर तयार करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभा करावा आणी प्रकल्पांतर्गत सेंद्रिय खत निर्मिती करून ते स्थानिक शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्यात. कृषी विभागाने भरारी पथक स्थापन करून कार्यान्वित करावे, महिला व बालविकास विभागाला पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून नागपूर मॉडेलच्या



धर्तीवर अंगणवाडी केंद्रांचे उन्नतीकरण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.लघु सिंचन विभागाने जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत. पाणीस्रोतांचे सर्वेक्षण करून मृत बंधारे पुनर्जीवित करावे, गॅबियन बंधारे तयार करावे आणी सि एस आर निधी उपलब्ध करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एकत्रित नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तर ग्रामपंचायत विभागाला टप्प्याटप्प्याने स्मशानभूमी विकासाची कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाच्या आढाव्यात जिल्ह्यातील गट विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे पालकमंत्री महोदय म्हणालेत. आरोग्य विभागाला नागपूर मॉडेलप्रमाणे मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व विभागांच्या समन्वयातून जिल्ह्यात २५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. शिक्षण विभागाने पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून जास्त पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये डिजिटल शाळा विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दूरवरून शाळेत येणाऱ्या पाच हजार विद्यार्थ्यांना सायकल उपलब्ध करून देण्याचाही निर्णय यावेळी घेण्यात आला.

पाणीपुरवठा विभागाला जुन्या योजनांची दुरुस्ती, रिचार्ज शाफ्ट उभारणी करण्याचे सूचित करून पाणीटंचाई निधी तातडीने वितरित केला जाईल असेही सांगण्यात आले. वाचन संस्कृतीला बाळकट करण्यासाठी जिल्ह्यातील १०० गावात मॉडेल वाचनालये तयार करण्यात येणार असून त्यासाठी वापरात नसलेल्या शासकीय इमारतींचा उपयोग करावा असे निर्देश मा. मंत्री महोदय यांनी दिलेत. एल निनो च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणात राबविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. प्रत्येक गावात नाला खोलीकरण, शेततळे आणि इतर उपाययोजना हाती घेण्यावर भर देण्यात आला. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सिंचन, घरकुल दिवाबत्ती आणि सौर ऊर्जा या विषयांना प्राधान्य देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी बैठकीत दिले. याशिवाय, यावर्षी कोणत्याही निधीतून अनावश्यक सिमेंट रस्त्यांची कामे करू नयेत आणि गावांतील पथदिवे सौर ऊर्जेवर रूपांतरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# महागाईविरोधात युवक काँग्रेसचे आगळेवेगळे आंदोलन

## हेच का तुमचे अच्छे दिन? म्हणत सराफा व्यापाऱ्यांना वाटली झालमुरी

दैनिक वादळ वार्ता

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने केंद्र व राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांविरोधात पुलगाव शहरात आगळेवेगळे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या आदेशानुसार माजी जिल्हा सोशल मीडिया काँग्रेस अध्यक्ष अमित ददगाल यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले.

महागाई, वाढते सोन्याचे दर, पेट्रोल-डिझेल व जीवनावश्यक वस्तूंच्या किमती याविरोधात युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान सराफा व्यापाऱ्यांना 'झालमुरी' वाटून सरकारच्या धोरणांविरोधात प्रतीकात्मक संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांच्या अडचणींवर भाष्य केले. लग्नसराईच्या काळात आपल्या लेकीला सोन्याची छोटीशी भेट द्यावी, अशी प्रत्येक गरीब बापाची इच्छा असते. मात्र वाढत्या महागाईमुळे आता सोन्याचा छोटासा तुकडाही




खरेदी करणे कठीण झाले आहे, अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

तसेच सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे बाजारपेठा मंदावल्या असून ग्राहकांची खरेदी क्षमता घटल्याने व्यापारी वर्गही अडचणीत सापडल्याचा आरोप करण्यात आला. एकेकाळी मोठी उलाढाल करणाऱ्या सराफा व्यापाऱ्यांवर आज प्रतिकूल परिस्थिती ओढवली असल्याचे सांगत आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. महागाईवर तातडीने नियंत्रण आणावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.या आंदोलनात शुभम ढोके, अमित शर्मा, महेश दयालानी, विकी साहू, शशांक लेकुरवाडे, नितेश मोहोळ, वेदांत शाहू, नसीम सौदागर, पिंटू कोडी, अनमोल साहू, अयान सय्यद, नैतिक वाघाडे, नेहाल ठाकूर, अमित मसराम यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीवर्गाचा गौरव



दैनिक वादळ वार्ता

**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणगांव प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याबद्दल श्रीविठ्ठल रखुमाई देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारीवर्गाचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात आरोग्य केंद्राच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद झाडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शासनाने नाचणगांवातील नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिक आणि रुग्णांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आरोग्यसेवा हीच ईश्वरसेवा मानून आम्ही सर्वजण सेवा देत आहोत. नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे, ही आमची जबाबदारी आहे,असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. अदिती लांबट आणि दिलीपउटाणे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून देवस्थान कमिटी, वारकरी आणि उपस्थित नागरिकांचे आभार मानले.कार्यक्रमात श्रीविठ्ठल रखुमाई देवस्थानचे अध्यक्ष केशवराव दांडेकर यांनी राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल संपूर्ण वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीवर्गाचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.सत्कार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पेशकार यांनी केले तर आभार प्रदर्शनही त्यांनीच केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अतुल चांदोरे, सुरेश पारीसे, विजय पोलार, सुधाकर सुरसे, गजानन सुरसे, प्रभाकर ढोक, मनोज उरकुडे तसेच सर्व वारकरी यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारधेवाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

# जलसमृद्ध अभियान आणि एकात्मिक ग्रामविकास अभियानाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील पारधेवाडी येथे आमदार अभिमन्यूजी पवार यांच्या अभिनव संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या जलसमृद्ध अभियान आणि एकात्मिक ग्रामविकास अभियान अंतर्गत आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला. गावातील नागरिकांसाठी आरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीची सवय वाढावी आणि ग्रामीण भागातील आरोग्यजागृती अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले.

शिबिरात विविध आरोग्यविषयक तपासण्या, प्राथमिक सल्ला आणि आवश्यक उपचारांची माहिती देण्यात आली. गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच लहान मुलांच्या पालकांनीही तपासणीसाठी उपस्थिती नोंदविली. अनेक नागरिकांनी वेळेत आरोग्य तपासणी करून घेतल्यामुळे आजारांचे लवकर निदान होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

आरोग्यसेवा गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न

ग्रामीण भागात अद्यापही नियमित वैद्यकीय तपासणीसाठी प्रवास करावा लागतो. वेळ, खर्च आणि उपलब्धतेच्या अडचणींमुळे अनेकदा नागरिक आरोग्य तपासणी पुढे ढकलतात. अशा पार्श्वभूमीवर हे शिबिर महत्त्वाचे ठरले. मोफत आरोग्य तपासणीमुळे गरजू नागरिकांना दिलासा मिळाला असून, नियमित आरोग्य तपासणीची गरज अधोरेखित झाली.या उपक्रमाचा संबंध केवळ उपचारांपुरता मर्यादित नसून, प्रतिबंध, जागृती आणि ग्रामविकास या व्यापक उद्दिष्टांशी जोडलेला असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे. जलसमृद्ध अभियानाच्या माध्यमातून पाणी, आरोग्य, स्वच्छता आणि जीवनमान उंचावण्यावर भर दिला जात असताना, एकात्मिक ग्रामविकास अभियानाद्वारे गावपातळीवर विविध सामाजिक उपक्रमांचे जाळे विणले जात आहे.

ग्रामविकासाशी जोडलेली आरोग्यजागृती

आरोग्य आणि विकास यांचा थेट संबंध असल्याचे तज्ज्ञ सातत्याने सांगत असतात. सुरक्षित पाणी, स्वच्छ परिसर, पोषण, आरोग्य तपासणी आणि वेळेवर उपचार या सर्व गोष्टी एकत्र आल्या तर ग्रामीण जीवनमानात लक्षणीय सुधारणा होऊ शकते. पारधेवाडीतील शिबिर हे याच दृष्टीकोनातून महत्त्वाचे मानले जात आहे.

शिबिरामुळे गावातील नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली. नियमित तपासणी, रक्तदाब, साखर, सामान्य आजारांची लक्षणे, महिलांचे आरोग्य, बालआरोग्य आणि जीवनशैलीजन्य आजारांबाबत माहिती देण्यात आली. या माध्यमातून आजार होण्यापूर्वीच त्याची शक्यता ओळखण्याचा संदेश गावात पोहोचला.

स्थानिक सहभाग आणि सामाजिक जबाबदारी

अशा शिबिरांच्या यशामागे स्थानिक कार्यकर्त्यांचा, आरोग्य पथकांचा

आणि गावकऱ्यांच्या सहभागाचा मोठा वाटा असतो. पारधेवाडीतील उपक्रमातही ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेतल्याचे दिसून आले. स्थानिक पातळीवर सामाजिक बांधिलकीतून राबविले जाणारे उपक्रम ग्रामीण भागात सकारात्मक बदल घडवू शकतात, हे या शिबिराने पुन्हा अधोरेखित केले.

आरोग्यसेवा ही केवळ शहरांपुरती मर्यादित राहू नये, या हेतूने असे उपक्रम राबविणे काळाची गरज आहे.

# साहित्यिक आणि समाज सेवकांचा कोमसाप उरणचा मधुबन कट्टा प्रेरणास्थान-नागेंद्र म्हात्रे

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

साहित्यिकांच्या आणि समाज सेवकांच्या कार्याचा गौरव करून सतत साडे दहा वर्षे कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप )मधुबन कट्ट्यावर नवोदितांना प्रेरणा देण्याचे कार्य अभिनंदनीय आहे,असे विचार कोमनादेवी संस्थेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणात विचार मांडले. ते कट्ट्याच्या १२७ व्या कार्यक्रमात बोलत होते.यावेळी साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील, चंद्रकांत मुकादम,प्रकाश म्हात्रे,बाजी घरत,भुवनेश पाटील,दत्ता निळवर्ण, रमाकांत घरत, अनंत पाटील,सुरेश गायकवाड ,मिना बिस्ट,श्रुती म्हात्रे इत्यादीची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समाजसेवक रमाकांत जयराम घरत, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पत्रकार विठ्ठल ममताबदे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्ता विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, मधुबनचे अध्यक्ष राम म्हात्रे,सचिव अजय शिवकर, केंद्रीय सचिव संजय होळकर यांनी कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.सूत्रसंचालन शिवप्रताप पंडित यांनी केले. या प्रसंगी सागर किनारा

या विषयावर कविसंमेलन घेण्यात आले, त्यावेळी बालकवी अनुप शिवकर,भरत पाटील,अनिल भोईर,संपदा ठाकूर, संजीव पाटील,न.ग. पाटील,मारुती तांबे, नामदेव पाटील अजय शिवकर, भालचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, सुरेश मेस्त्री इ.१६ कवींनी कविता सादर केल्या.होळकर संजय यांनी आभार मानले.

# शहराचा विकास गेला खड्ड्यात नगरसेवक वादग्रस्त मुद्द्यांत दंग

दैनिक वादळ वार्ता

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी अजूनही संघर्ष करावा लागत असताना अनेक नगरसेवक मात्र विकासकामांपेक्षा वादग्रस्त मुद्द्यांमध्ये अधिक गुंतलेले दिसत आहेत. रस्त्यांवरील खड्डे, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन आणि वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महापालिकेच्या बैठकीतही विकासाच्या विषयांवर सखोल चर्चा होण्याऐवजी आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय वाद यांनाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे चित्र आहे. अनेक भागांमध्ये रस्त्यांची दुरवस्था



झालेली असून पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची कामे अद्याप रखडलेली आहेत.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, निवडणुकांच्या वेळी मोठमोठी आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आता जनतेच्या प्रश्नांकडे पाठ फिरवत आहेत. शहराच्या विकासासाठी ठोस नियोजन आणि प्रामाणिक अंमलबजावणीची गरज असताना राजकीय संघर्षामुळे विकासकामांना खीळ बसत असल्याची टीका होत आहे.

दरम्यान, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रखडलेली विकासकामे मार्गी लावावीत,अशी मागणी केली आहे.

# गावच्या आरोग्यदायिनी देवदूतांचा सन्मान! काठी येथे आशा स्वयंसेविकांचा भव्य गौरव सोहळा

## १५ वर्षांत पाऊण लाखापेक्षा जास्त दुर्गम भागातील रुग्णांना संजीवनी; याहामोगी संस्था अन् सुप्रिम इंडस्ट्रीजचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी**

दुर्गम सातपुड्याच्या कडेकपाऱ्यात, उन्हाळा, पावसाळा की हिवाळा... ऋतु कोणताही असो, रात्रंदिवस आरोग्याची सेवा देणाऱ्या 'आशा' स्वयंसेविका या ग्रामीण भागासाठी खऱ्या अर्थाने देवदूत आहेत. त्यांच्या याच अथांग परिश्रमांची आणि निस्वार्थी सेवेची कृतज्ञता म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र काठी (तालुका अक्कलकुवा) येथे आशा कार्यकर्तींचा भव्य 'सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला.

दि सुप्रिम इंडस्ट्रीस लिमिटेड गाडेगाव पुरस्कृत व याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्था धडगाव संचालित 'फिरता दवाखाना व किशोरींचे आरोग्य शिक्षण उपक्रम' अंतर्गत या कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आशा भगिनींना ट्रॉफी आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, ज्यामुळे उपस्थित सर्वच आशा वर्करचा आत्मविश्वास कमालीचा उंचावला.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना संस्थेचे सचिव विठ्ठल कदम भावूक झाले होते. जानेवारी २०११ पासून अत्यंत खडतर परिस्थितीत सुरू असलेल्या या प्रवासाचा आढावा त्यांनी मांडला. ते म्हणाले,

दुर्गम पाड्यांवरील शेवटच्या माणसापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याचे मोठे काम या आशा भगिनी करत आहेत. त्या गावासाठी आरोग्यदायिनी आहेत. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे हे आमचे परमकर्तव्य आहे.त्यांनी सांगितले की गावपातळीवरील ५७२८५, निवडक आश्रमशाळेत ११,०९७ आदिवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी.

अस्तांबा यात्रा व विशेष शिबिरांतर्गत ८,३६२ भाविक व रुग्णांना सेवा.१७९ कार्यशाळांच्या माध्यमातून ८,२०९ बाल व किशोरींना आरोग्याचे धडे. १३,४२२ विद्यार्थ्यांनी आश्रमशाळांमध्ये लेखी परीक्षेत सहभाग घेतला.केवळ उपचारच नाही तर दुर्गम भागातील



मुलींचे आरोग्य सुधारावे म्हणून या उपक्रमांतर्गत किशोरींना १३ प्रकारच्या भाजीपाला बियाण्यांचे वाटप करण्यात आले. तसेच मासिक पाळीच्या स्वच्छतेसाठी सुती कापडाचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, कोविडच्या जागतिक महामारीच्या काळात जेव्हा सर्व काही बंद होते, तेव्हा 'भांगरापाणी' या गावी सुंदर माझे घर ही अनोखी स्पर्धा राबवून आशा वर्करच्या मदतीने गावात स्वच्छतेचा संदेश पोहोचवण्यात आला.

या सोहळ्यात फिरत्या दवाखान्यात सेवा देणारे डॉक्टर्स, परिचारिका आणि गटप्रवर्तकांसह काठी, वेरी, चनवाई, मोलगी, भगदरी, वेलखेडी, सांबर, व डेब्रामाळ येथील २८ आशा कार्यकर्तींचा व्यासपीठावर विशेष गौरव करण्यात आला.त्यामध्ये डॉ कुलदीप ठाकरे, डॉ सरस्वती पाडवी, डॉ कपिल पावरा, डॉ तानाजी पावरा, परिचारिका रंजना नवेज,गट प्रवर्तिका बिंदा वसावे आणि आशा पाडवी.

याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र काठीचे वैद्यकीय अधिकारी डॉ इंद्रसिंग वसावे, डॉ कुलदीप ठाकरे, ग्रामीण रुग्णालय धडगावचे डॉ कपिल पावरा, आरोग्य विस्तार अधिकारी रमेश शिंदे, आणि दिलू गावित प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात आशा वर्करच्या कामाचे कौतुक करत, हा सन्मान त्यांच्या पुढील कार्याला नवी ऊर्जा देणारा ठरेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक, MPW, ANM, ए सूचीचे कर्मचारी आणि सर्व ४८ आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा शेवट केवळ कौतुकापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्याला सामाजिक परिवर्तनाची जोड देण्यात आली. संस्थेचे सचिव विठ्ठल कदम यांनी उपस्थित सर्व आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि आशा भगिनींना 'सामूहिक बाल विवाह प्रतिबंध प्रतिज्ञा' दिली. आरोग्यासोबतच समाजातील अनिष्ट प्रथा दूर करण्याचा संकल्प करत या प्रेरणादायी सोहळ्याची सांगता झाली.

# 'नशा' व 'व्यथा' या एकांकिकांतून समाजाचे वास्तव प्रतिबिंबित

## शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या नाट्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने तसेच संस्कृती मंत्रालय, दिल्ली यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य नाट्य स्पर्धेला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील विविध समस्या, बदलती मानसिकता आणि वास्तववादी घटनांवर भाष्य करणाऱ्या 'नशा' व 'व्यथा' या एकांकिकांनी प्रेक्षकांची मने जिंकली.माजलगांव येथील व्यंकटेश हॉटेल येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक आशय, संस्कृतीचे जतन आणि कलावंतांच्या सर्जनशीलतेचे प्रभावी दर्शन घडले. भारताला संस्कृती आणि नाट्य चळवळीचा समृद्ध वारसा लाभला असून, तो वारसा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अशा नाट्य स्पर्धांमधून होत असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले.'नशा' या एकांकिकेतून



व्यसनाधीनतेमुळे उद्ध्वस्त होणारे कुटुंब आणि समाजावर होणारे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. तर 'व्यथा' या एकांकिकेतून सर्वसामान्यांच्या मनातील वेदना, संघर्ष आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्रण साकारण्यात आले. कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे प्रेक्षक भावूक झाले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी कला आणि नाटक ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे असल्याचे सांगत कलाकारांचे कौतुक केले. समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे वास्तव एकांकिकांच्या माध्यमातून ठळकपणे मांडले जाते आणि त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब सतत उमटत राहते, असे मतही व्यक्त करण्यात आले.या नाट्य स्पर्धेमुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळाले असून सांस्कृतिक चळवळीला नवसंजीवनी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिव बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या राज्यस्तरीय समितीवर डॉ.नीलम गोऱ्हे यांची निवड; सातारा जिल्ह्याची 'प्रभारी' म्हणून जबाबदारी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज या सर्वसामान्यांचे शासकीय प्रश्न एकाच छताखाली गतीने सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १)' राबवले जात आहे. हे अभियान अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्यासाठी शासनाने नुकतीच राज्यस्तरीय समितीची फेररचना १८ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार (GR) केली आहे. मा. महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या उच्चस्तरीय समितीमध्ये शिवसेना नेत्या, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा समावेश करण्यात आला असून, त्यांच्यावर 'सातारा' जिल्ह्याची जिल्हास्तरीय प्रभारी (In-charge) म्हणून महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल आणि सोपवलेल्या जबाबदारीबद्दल डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मा. पर्यटन मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई आणि मा. नेत्या सुनेत्राताई पवार यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

या अभियानांतर्गत सातारा जिल्ह्यातील नियोजित शिबिरांच्या यशस्वीतेसाठी डॉ. नीलम गोऱ्हे या विशेष प्रयत्न करणार आहेत. त्या जिल्ह्यातील शिबिर स्थळांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी दौरे करतील, तसेच या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांच्या समन्वय बैठका घेऊन आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना व निर्णय घेतील.

**असे असेल अभियानाचे स्वरूप व कामे**

'शासन आपल्या दारी' या संकल्पनेवर आधारित या अभियानात नागरिकांना शासकीय कार्यालयांमध्ये चकरा माराव्या लागू नयेत, म्हणून एकाच छताखाली अनेक सेवा दिल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न, जात व रहिवासी दाखले देणे; ७/१२, ८-अ उतारा व फेरफार नोंदींमधील त्रुटी दूर करणे; संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे अर्ज मंजूर करणे, तसेच नवीन शिधापत्रिका (रेशन कार्ड) व ओळखपत्र दुरुस्ती यांसारखी सर्व महत्त्वाची कामे जागेवरच निकाली काढली जातात.डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या व्यापक सामाजिक आणि प्रशासकीय अनुभवामुळे सातारा जिल्ह्यातील महसूल शिबिरांच्या माध्यमातून तळागाळातील हजारो नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

# मानसिक तणाव नियंत्रणासाठी व्यायाम व योग्य आहार आवश्यक-डॉ.श्रेयस देशपांडे

## विठाई हॉस्पिटलच्या वर्धापनदिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे विठाई हॉस्पिटल आणि हरिप्रल्हाद मेडिकल यांच्या वर्धापनदिनानिमित्त विशेष उपक्रम म्हणून मंगळवारी मोफत बीपी व शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरात माजलगाव येथील सुप्रसिद्ध तज्ञ डॉक्टर श्रेयस देशपांडे यांनी पंचक्रोशीतील शेकडो रुग्णांची मोफत तपासणी केली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की,



आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक तणाव मोठ्या प्रमाणात वाढत असून तो नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप अत्यंत गरजेची आहे. चुकीची जीवनशैली, अनियमित खाणेपिणे आणि व्यसनाधीनता यामुळे मधुमेह, रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत. ही गरज ओळखून विठाई हॉस्पिटलचे संचालक डॉ. रामेश्वर जंगले व डॉ. प्रतीक्षा जंगले यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये नागरिकांची बीपी, शुगर तपासणी करून आवश्यक ते वैद्यकीय सल्ले देण्यात आले. अनेक रुग्णांनी प्रथमच अशा प्रकारच्या आरोग्य शिबिराचा लाभ घेतल्याची भावना व्यक्त केली.

मोफत आरोग्य शिबिरामुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले. सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचविण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी हरिप्रल्हाद मेडिकलचे संचालक गोपाळ खेत्री, संतोष खेत्री, भीमराव जंगले, दामोदर खेत्री, कृष्णा खाडे, रामू काजळे तसेच नागनाथ खटले यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत हे आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.

# राजमाता जिजाऊचे वंशज शिंदखेड राजा येथील श्री.शिवाजी राजे जाधव यांचा केज मध्ये सत्कार संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील शासकीय विश्रामगृह येथे सिंदखेड राजा येथील राजमाता जिजाऊ यांचे वंशज श्री. शिवाजी राजे जाधव यांनी धावती सदिच्छा भेट दिली असताना छावा संघटनेचे जिल्हा प्रमुख श्री.शिवाजी दादा ठोंबरे व केज विकास संघर्ष समितीचे प्रमुख श्री.हनुमंत भोसले सर, बहुजन क्रांती मोर्चाचे श्री.बाबुराव गालफाडे सर,तसेच रोटरी क्लब ऑफ केजचे महेश जाजू, मराठा आरक्षण उपोषण कर्ते दिगंबर नाना तपसे, माजी सैनिक संघटनेचे सपाटे सर व पत्रकार पांडुरंग कसबे ईत्यादी मान्यवर मंडळी यावेळी उपस्थित होतें.यावेळी श्री.शिवाजीराजे जाधव राजमाता जिजाऊ यांचे वंशज असे म्हणाले की, दि.१५ जुन ते १७ जुन २०२६ रोजी राजमाता जिजाऊ यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित सिंदखेडराजा ते पाचड रायगड रॅली मध्ये बीड व केज येथील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.यावेळी मोठ्या संख्येने रलीमध्ये सहभागी होणार असल्याचे शिवाजी दादा ठोंबरे यांनी यावेळी सांगितले.

# दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्रातर्फे पशुआरोग्य शिबिराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक २० मे २०२६ रोजी अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथे पशु आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये शेतकऱ्यांना गोआधारित शेती,सेंद्रिय शेती तसेच पशुधन व्यवस्थापना बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सुगाव चे सरपंच श्री.बंडू मारुती शिंदे हे होते.यावेळी सुगाव चे रोजगार सेवक श्री.अतुल अभिमान शिंदे,प्रगतशील शेतकरी श्री.महादेव मारुती शिंदे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे पशु तज्ञ डॉ.रवींद्र कोरके उपस्थित होते.शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र कोरके यांनी सांगितले की,सध्याच्या परिस्थितीत शेती उत्पादन खर्चात मोठी वाढ होत असून शेतकऱ्यांनी गोआधारित व नैसर्गिक शेतीकडे वळणे काळाची गरज आहे.जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून त्या आधारे संतुलित खत व्यवस्थापन करावे. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून शेणखत,हिरवळीची खते,पिकांचे अवशेष, काडी-कचरा व इतर सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.ते पुढे म्हणाले की,मराठवाडा भागातील जमिनींमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अत्यंत कमी होत चालले असून ते वाढविण्यासाठी सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने खाद्य व्यवस्थापन करणे तसेच नियमित दर तीन महिन्यांनी जंतनिर्मूलन करणे गरजेचे आहे. पशुधनाला वेळापत्रका नुसार लसीकरण केल्यास विविध संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण मिळते,असेही त्यांनी स्पष्ट केले. शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच श्री.बंडू मारुती शिंदे यांच्या हस्ते देशी गोवंश पूजन करून करण्यात आले.शिबिरा दरम्यान पशुधनांना जंतनिर्मूलनाच्या मात्रा देण्यात आल्या.एकूण १६६ पशुधनांवर जंत निर्मूलन उपचार करण्यात आले.या शिबिरात ४८ शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील प्रगतशील शेतकरी श्री.मारुती शिंदे व श्री.काकासाहेब अडसूळ यांनी विशेष सहकार्य केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077